# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दै. सकाळ

दि. २८/१२/२०२५

## सव्वा आठ लाखांची रोकड भिवंडीत जप्त

### आचारसंहिता पथकाची कारवाई

भिवंडी, ता. २५ (वार्ताहर) : भिवंडी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी शहरात कडकपणे सुरू झाली आहे. मंगळवारी (ता.२३) सायंकाळी शहराच्या प्रवेशद्वारावर असलेल्या नदी नाका परिसरात आचारसंहिता पथकाने एका कारची तपासणी केली असता, त्यातून आठ लाख २८ हजार ९०० रुपयांची बेहिशोबी रोकड जप्त करण्यात आली.

निवडणूक आचारसंहिता पथकाचे प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक पथक प्रमुख समीर जवरे आणि शाकीब खर्ब यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख गौतम भालेराव, पोलिस कर्मचारी मारोती भारती, पालिका कर्मचारी निखिल साळवे, एजाज शेख आणि मनोज गुज्जा हे सायंकाळी साडेसहाच्या सुमारास नदी नाका येथे वाहनांची तपासणी करत होते. या वेळी वाडाकडून भिवंडीच्या दिशेने येणारी कार (क्र. एमएच ४८ डीडी ९३२४) संशयास्पद वाटल्याने पथकाने ती थांबवली. कारची झडती घेतली असता त्यामध्ये आठ लाख २८ हजार ९०० रुपयांची रोकड आढळली.

कारचालक चेतन किशन मित्तल यांच्याकडे या रक्कमेबाबत विचारणा केली असता, ते कोणतीही वैध कागदपत्रे सादर करू शकले नाहीत किंवा समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. त्यामुळे पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करून ही रक्कम जप्त केली. जप्त केलेली रोकड कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलिसांच्या स्वाधीन केली आहे.

दै. पुण्यनगरी

## भिवंडीत सव्वाआठ लाखांची रोकड जप्त

भिवंडी : आचारसंहिता पथकांकडून मुख्य रस्त्यांवर शहरात येणाऱ्या वाहनांच्या तपासणीस सुरुवात झाली आहे. मंगळवारी नदी नाका येथील पथकाने एका वाहनातून ८ लाख २८ हजार रुपयांची रोकड जप्त केली आहे. पथकप्रमुख गौतम आनंद भालेराव, मारोती भागोजी भारती, निखील साळवे, एजाज शेख, मनोज गुज्जा यांनी मंगळवारी सायंकाळी वाहनांच्या तपासणी करताना एका कारमधून त्यांनी सव्वा आठ लाखांची रक्कम जप्त केली.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि. २६/१२/२०२५

दै. लोकमत

## भिवंडीत उमेदवारांना खर्चाची ९ लाखांची मर्यादा

भिवंडी : निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा ९ लाखांपर्यंत केली आहे. प्रचारासाठी रॅलीसह, सभा, बॅनर, नाष्ट्यापासून ते स्टेशनरीपर्यंत सुमारे ५०२ साहित्यांची यादी प्रसिद्ध केली. निवडणूक विभागाने दिलेल्या खर्चात वडापाव खर्च १३ रुपये, वडा उसळ ३० रुपये, समोसा १५ रुपये, इडली सांबार ३०, मेदू वडा, चटणी ४० रुपये, नारळ पाणी ४० रुपयांपर्यंत सूचना आहेत.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि.२६/१२/२०२५

दै० पुढारी

## भिवंडीत मंगळवारी ५५६ अर्जांची विक्री

**भिवंडी :** भिवंडी पालिका निवडणुक प्रक्रिया मंगळवार (२३) पासून सुरू झाली असून बुधवारी दुसऱ्या दिवशी ५५६ अर्जांची विक्री झाली असून एक उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. दोन दिवसात एकूण १०५२ अर्ज विक्री झाली आहे. अशी माहिती पालिका जनसंपर्क विभागाने दिली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ कार्यालयातून ५० नामनिर्देशन अर्जांची विक्री करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक २ च्या कार्यालयातून ९१ अर्जांची विक्री, निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ३ च्या कार्यालयातून ७० उमेदवार अर्ज, निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ४ मधून १४७ अर्ज, निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ५ कार्यालयातून ७८ उमेदवारी अर्ज, निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ६ मधून ४१ उमेदवार अर्ज विक्री तर निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ७ च्या कार्यालयातून ७९ असे एकूण ५५६ नामनिर्देशन अर्जांची विक्री करण्यात आली असून बुधवारी दुसऱ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ६ यांच्या कार्यालयात १ अपक्ष अर्ज दाखल झाला आहे अशी माहिती मनपा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि.२६/१२/२०२५

दै० आपलं महानगर

# गांजा आणि बेकायदा पिस्तुल बाळगणाऱ्याला अटक

**आपलं महानगर वृत्तसेवा**

**वार्ताहर। भिवंडी:** आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलीस आयुक्तांच्या निर्देशानुसार, राज्यात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेनुसार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि निष्पक्ष आणि निर्भय निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी बेकायदेशीर शस्त्रास्त्रे बाळगणे आणि अंमली पदार्थांच्या तस्करीत सहभागी असलेल्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. अशातच भिवंडी गुन्हे शाखा युनिट-२ ला मोठे यश मिळाले आहे.२४ डिसेंबर २०२५ रोजी, गुन्हे शाखा युनिट-२ भिवंडीला आरिफ सिद्दीकी नावाचा एक तरुण गायत्री नगर परिसरात गांजा विकण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली.



माहितीच्या आधारे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनावणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक मिथुन भोईर, उपनिरीक्षक रवींद्र बी. पाटील आणि त्यांच्या पथकाने न्यू आझाद नगरमधील फैज-ए-आम हायस्कूलजवळ सापळा रचला.पोलिसांनी साक्षीदारांच्या उपस्थितीत आरोपी आरिफ अब्रार अहमद सिद्दीकी (१९) याला अटक केली. झडती दरम्यान आरोपीकडून १ किलो ९०४ ग्रॅम गांजा, एक माऊसर पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस असा एकूण १ लाख २० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपी अब्रार विरुद्ध भिवंडी येथील शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास गुन्हे शाखा युनिट-२ चे उपनिरीक्षक रामचंद्र जाधव तपास करत आहेत. दरम्यान ठाणे पोलिस उपायुक्त (गुन्हे) अमरसिंग जाधव आणि सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे तपास-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.तर निवडणूक काळात कायदा आणि सुव्यवस्थेशी खेळणाऱ्या आणि बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांवर अशी कडक कारवाई सुरूच राहील, असे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दै० पुढारी

# अमली पदार्थ, काडतूसासह गावठी कट्टा बाळगणाऱ्यास अटक

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

भिवंडीतील शांतीनगर परिसरात गांजा हा अमली पदार्थ बाळगणाऱ्यास गावठी कट्टा, जिवंत काडतूससह अटक करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर आचारसंहिते दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखत निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिस यंत्रणेने कंबर कसली आहे. त्या अनुषंगाने भिवंडीत गुन्हे शाखेच्या पथकास मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे शांतीनगर परिसरात केलेल्या सापळा रचत केलेल्या कारवाईत गांजा या अमली पदार्थासह गावठी कट्टा व जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास अटक करण्यात यश मिळवले आहे. आरीफ सिद्धिकी (वय १९) असे अटक आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस शिपाई अमोल इंगळे गुप्त बातमीदारांकडून एक संशयित युवक गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने २४ डिसेंबर रोजी रात्री आझादनगर येथे सापळा रचून कारवाई केली. ज्यामध्ये संशयित आरोपी आला असता पोलीस पथकाने त्यास ताब्यात घेत त्याची झडती घेतली. त्याच्याजवळ १.९०४ ग्रॅम वजनाचा गांजा, एक गावठी पिस्टल, एक जिवंत काडतुस असा १ लाख २० हजार ६०० रुपयेचा मुद्देमाल हस्तगत केला असून शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करून अटक केली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. लोकमत

# २७ महापालिकांत कुणाचे किती नगरसेवक?

## गेल्यावेळी भाजपचे १०९९ तर शिवसेनेचे ४८९ नगरसेवक; ४३९ जागा जिंकून काँग्रेस होती तिसऱ्या क्रमांकावर

लोकमत विश्लेषण
नारायण जाधव
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** राज्यातील २७ महापालिकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. २०१५ ते २०१८ दरम्यान राज्यात २७ महापालिका होत्या. एकूण २७३४ वॉर्डात १७४३८ उमेदवार उभे होते. त्यात गेल्यावेळी २७३४ नगरसेवक निवडून आले होते. सर्वाधिक १०९९ नगरसेवक निवडून आल्याने भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. भाजपापाठोपाठ एकसंध शिवसेनेचे ४८९ तर अस्तित्वासाठी झगडणाऱ्या काँग्रेसचेसुद्धा ४३९ नगरसेवक होते. त्यानंतर शरद पवारांची राष्ट्रवादी २९४ जागांवर चौथ्या स्थानावर होती. याशिवाय राज ठाकरेंची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे २६ तर मायावतींच्या बसपाचे ३८ नगरसेवक होते. शेकाप, बहुजन विकास आघाडीसह इतर नोंदणीकृत पक्षांचे २९६ आणि ८९ अपक्ष म्हणून निवडून आले होते.

### कोणाची किती मजल?

**शिवसेना :** मुंबईत ८४, ठाणे ६७ आणि कल्याण-डोंबिवलीत ५२ अशी मजल गाठली होती.

**राष्ट्रवादी :** नवी मुंबईत ५२, पुणे जिल्हा पुण्यात ३९, पिंपरी-चिंचवडमध्ये ३६ आणि ठाण्यात ३४ अशी मजल मारली होती.

**मनसे :** मुंबईत ७, कल्याण-डोंबिवली ९, नाशिक ५, पुणे २, पिंपरी-चिंचवड १ आणि चंद्रपूर २ अशी मजल मारली होती.

### राज्यातील महापालिकानिहाय पक्षीय बलाबल नेमके काय?

(एकूण जागानिहाय - नगरसेवक संख्या)

| महापालिका | एकूण | भाजप | शिवसेना | काँग्रेस | राष्ट्रवादी | मनसे | इतर पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | २२७ | ८२ | ८४ | ३१ | ९ | ७ | ९ | ५ |
| ठाणे | १३१ | २३ | ६७ | ३ | ३४ | ० | २ | २ |
| नवी मुंबई | १११ | ६ | ३८ | १० | ५२ | ० | ० | ५ |
| कल्याण-डोंबिवली | १२० | ४२ | ५२ | ४ | २ | ९ | २ | ९ |
| उल्हासनगर | ७८ | ३२ | २५ | १ | ४ | ० | ५ | ११ |
| भिवंडी-निजामपूर | ९० | १९ | १२ | ४७ | ० | ० | १० | २ |
| पनवेल | ७८ | ५१ | ० | २ | २ | ० | २३ | ० |
| मीरा-भाईंदर | ९५ | ६१ | २२ | १० | ० | ० | ० | २ |
| वसई-विरार | ११५ | १ | ५ | ० | ० | ० | १०६ | ३ |
| नाशिक | १२२ | ६६ | ३५ | ६ | ६ | ५ | १ | ३ |
| मालेगाव | ८४ | ९ | १३ | २८ | २० | ० | १३ | १ |
| धुळे | ७४ | ५० | १ | ६ | ८ | ० | ८ | १ |
| जळगाव | ७५ | ५७ | १५ | ० | ० | ० | ३ | ० |
| अहमदनगर | ६८ | १४ | २४ | ५ | १८ | ० | ३ | २ |
| पुणे | १६२ | ९८ | १० | ९ | ३९ | २ | १ | ३ |
| पिंपरी-चिंचवड | १२८ | ७७ | ९ | ० | ३६ | १ | ० | ५ |
| सांगली-मिरज-कुपवाड | ७८ | ४१ | ० | २० | १५ | ० | १ | १ |
| सोलापूर | १०२ | ४९ | २१ | १४ | ४ | ० | १३ | ० |
| कोल्हापूर | ८१ | १३ | ४ | २७ | १५ | ० | १९ | ३ |
| औरंगाबाद | ११५ | २२ | २८ | १० | ३ | ० | ३४ | १८ |
| परभणी | ६५ | ८ | ६ | ३१ | १८ | ० | ० | २ |
| नांदेड-वाघाळा | ८१ | ६ | १ | ७३ | ० | ० | ० | १ |
| लातूर | ७० | ३६ | ० | ३३ | १ | ० | ० | ० |
| अमरावती | ८७ | ४५ | ७ | १५ | ० | ० | १९ | १ |
| अकोला | ८० | ४८ | ८ | १३ | ५ | ० | ३ | ३ |
| नागपूर | १५१ | १०८ | २ | २९ | १ | ० | १० | १ |
| चंद्रपूर | ६६ | ३६ | २ | १२ | २ | २ | ९ | ३ |

**भाजप**
नागपूर १०८, मुंबईत ८२, पुणे ९७, पिंपरी-चिंचवड ७७, नाशिक ६६, मीरा-भाईंदर ६१, पनवेल ५१, धुळे ५०, जळगाव ५७ या शहरात ५० पार नगरसेवक होते.

**काँग्रेस**
नांदेडमध्ये ७३, भिवंडीत ४७, लातूर ३३, मुंबईत ३१, परभणी ३१, मालेगाव २८, कोल्हापूर २७, नागपूर २९, अमरावती १५, अकोला १३, चंद्रपूर १२, सोलापूर १४, सांगली २०, औरंगाबाद अर्थात छ. संभाजीनगर, नवी मुंबई आणि मीरा-भाईंदर मध्ये १० अशी दुहेरी संख्या ओलांडली होती.

जालना आणि इचलकरंजी या दोन नव्याने स्थापन महापालिकांच्या होत आहे.




### कोणत्या विभागात कोणत्या पक्षाचे प्राबल्य?

**मुंबई/कोकण :** भाजप आणि तेव्हाची एकसंध शिवसेना या पक्षांचे प्राबल्य प्रामुख्याने दिसून येते.

**उत्तर महाराष्ट्र :** उत्तर महाराष्ट्रात भाजप हा प्रमुख शक्तिकेंद्र आहे.

**पश्चिम महाराष्ट्र :** पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आघाडीवर असला तरी राष्ट्रवादीची स्थितीही मजबूत होती. कोल्हापूर, सांगलीत काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी दिसून येते.

**मराठवाडा :** मराठवाड्यात काँग्रेस आणि भाजप यांच्यात तीव्र संघर्ष दिसतो.

**विदर्भ :** विदर्भात भाजपचे वर्चस्व सर्वाधिक ठळक आहे. त्या तुलनेत शिवसेना आणि राष्ट्रवादीची फारशी ताकद गेल्या वेळी नव्हती.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दि. २५/११/२०२०